
www.janatabankpune.com

# गरुड झेप

सन २०१८ – अंक १ (जनता सहकारी बँक लि., पुणे द्वारा प्रकाशित गृहपत्रिका : केवळ खासगी वितरणासाठी)

## अध्यक्षांचे लेखणीतून



चालू आर्थिक वर्षाच्या समाप्तीसाठी जेमतेम काही दिवसांचा कालावधी शिल्लक आहे. हे वर्ष भारतीय अर्थव्यवस्थेवर दूरगामी परिणाम करणाऱ्या सरकारच्या अनेक निर्णयांनी गाजले. नोटबंदीच्या निर्णयानंतर परिस्थिती पूर्वपदावर येतच होती, तेवढ्यात सरकारने जीएसटीचा कायदा लागू केला. या घटनांच्या पार्श्वभूमीवर बँकेने वर्ष २०१७-१८ साठीचे व्यवसायाचे अंदाजपत्रक तयार केले आणि त्याची अंमलबजावणी सुरू केली. नोटबंदी आणि जीएसटीच्या निर्णयानंतर निर्माण झालेले मंदीचे सावट कमी जास्त प्रमाणात वर्षभर कायम होते. या वातावरणात कर्जविस्तार करून बँक आपला सीडी रेशो सत्तरपर्यंत राखण्यात यशस्वी झाली आहे. थकीत कर्जाच्या वसुलीची प्रक्रिया तसेच नव्याने अनुत्पादक होणाऱ्या कर्जाची घसरण रोखण्यासाठी कर्जाचे प्रभावी नियंत्रण बँकेने नेटाने वर्षभर चालू ठेवले. त्यामुळे वर्षअखेर कर्जाची गुणवत्ता सुधारून बँकेच्या व्याजाच्या उत्पन्नात वाढ होईल, यात शंका नाही.

वर्षअखेर बँकेच्या सभासदांच्या संख्येत तसेच वसूल भागभांडवलात वाढ झाली आहे. ही बाब उत्साहवर्धक आहे. व्यवसाय वृद्धीच्या इतर घटकांचा वेग उद्दिष्टांएवढा नसला, तरी इतर बँकांच्या चालू वर्षाच्या व्यवसाय विस्तारापेक्षा तो तुलनेने अधिक आहे. व्यवसायाच्या वृद्धीसाठी शाखास्तरावर, सामान्य ग्राहकांना गुंतवणुकीचे महत्त्व पटवून देण्यासाठी जवळ जवळ सर्व शाखांतून गुंतवणूक दिवसाचे, जागतिक महिला दिनाचे, वर्धापन दिवसाचे आयोजन, व्यावसायिकांसाठी मेळावे, तीळगुळ कार्यक्रम, इच्छापत्र व खाजगी विश्वस्त निधीविषयी जागरूकता अभियान इत्यादी उपक्रम राबविले गेले. या कार्यक्रमांतून शाखांनी बँकेच्या प्लॅटिनम कार्ड, भीम जेट पे यूपीआय ॲपसारख्या अद्ययावत आयटी तंत्रज्ञानावर आधारित सेवांचीदेखील ओळख ग्राहकांना करून दिली. काही शाखांनी शहरातील प्रख्यात व्यक्तींना गुंतवणूक आणि तत्सम महत्त्वाच्या विषयावर विचार मांडण्यासाठी आमंत्रित केले होते. अशा उपक्रमांतून ग्राहकांशी आपले संबंध दृढ होण्यास तसेच बँकेची प्रतिमा उजळ होण्यास मदत होते. शाखांच्या या प्रयत्नामुळे बँकेच्या 'कासा' ठेवीत वाढ झाली आहे. वर्षअखेर बँकेचा व्याजाचा खर्च कमी होऊन नफा वाढेल, ही अपेक्षा. डिजिटल बँकिंगच्या माध्यमातून केंद्र सरकार कॅशलेस अर्थव्यवस्थेच्या दिशेने अग्रेसर होत आहे. नॅशनल पेमेंट कॉर्पोरेशन ऑफ इंडियाची स्थापना करून तिच्याद्वारे सरकार देशात पेमेंट सिस्टिममध्ये क्रांतिकारी बदल करीत आहे. त्यामुळे डिजिटल बँकिंगचा वेग वाढणार आहे. केंद्र सरकारच्या डिजिटल बँकिंग अभियानात सक्रिय सहभाग नोंदविण्यासाठी आपल्या बँकेने अद्ययावत तंत्रज्ञानावर आधारित 'भीम जेट पे यूपीआय ॲप'ची निर्मिती केली आहे. त्यामुळे ग्राहक मोबाइल फोनद्वारे पैशाची देवाणघेवाण, युटिलिटी पेमेंट, खात्यावरील शिल्लक तपासणे इत्यादी सुविधा प्राप्त करू शकतात. हे ॲप जनसामान्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी अधिक प्रयत्नांची गरज आहे.

बँकेची एकाहत्तरावी आणि पुणे शहरातील सव्विसावी 'बिबवेवाडी' शाखा २८ मार्च रोजी कार्यान्वित झाली आहे. महाराष्ट्र आणि गुजरातसारख्या देशाच्या सधन राज्यांत शाखाविस्तार आणि कसल्याही आव्हानांना यशस्वीपणे सामोरे जाऊन यश खेचून आणणारा लढवय्या कर्मचारी वर्ग आणि सर्व ग्राहक वर्ग ही जनता बँकेची ताकद आहे. अखेरच्या क्षणी कामगिरीची आकडेवारी सुधारण्यात कर्मचारी वर्ग सध्या मग्न आहे. फेब्रुवारी आणि मार्च २०१८ मध्ये बँकेने केलेल्या आवाहनास उत्स्फूर्त प्रतिसाद देत जवळपास सर्व सेवक वसुली व ठेववाढ यासाठी दुसऱ्या आणि चौथ्या शनिवारी बँकेत स्वेच्छेने कामास उपस्थित होते. यासाठी त्यांचे कौतुक करावे तेवढे थोडेच आहे. बँकेच्या व्यवसाय वृद्धीसाठी केलेल्या आपल्या प्रयत्नांना परमेश्वर भरघोस यश देईल, असा मला पूर्ण विश्वास आहे. शालिवाहन शक १९४० या हिंदू नववर्षासाठी आपणा सर्वांना खूप खूप शुभेच्छा!

## बँकेच्या बिबवेवाडी शाखेचे उद्घाटन

### एटीएम केंद्र कार्यान्वित, बँकेची ७१ वी शाखा



**बँकेच्या बिबवेवाडी शाखेचे उद्घाटन विश्वकर्मा इन्स्टिट्यूट समूहाचे अध्यक्ष मा. श्री. भरतजी आगरवाल यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी बँकेचे अध्यक्ष मा. श्री. संजय लेले, उपाध्यक्ष मा.श्री. जगदीश कदम, बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मा.श्री. जयंत काकतकर आणि शाखा व्यवस्थापक श्री. निलेश देशपांडे.**

बँकेच्या बिबवेवाडी शाखेचे उद्घाटन विश्वकर्मा इन्स्टिट्यूट समूहाचे अध्यक्ष मा. श्री. भरतजी आगरवाल यांच्या हस्ते, तर येथील एटीएम केंद्राचे उद्घाटन बँकेचे उपाध्यक्ष मा. श्री. जगदीश कदम यांच्या हस्ते बुधवार दिनांक २८ मार्च २०१८ रोजी करण्यात आले. बँकेची ही ७१ वी शाखा आहे. उद्घाटनप्रसंगी बँकेचे अध्यक्ष मा. श्री. संजय लेले, संचालक मंडळ सदस्य, मुख्य कार्यकारी अधिकारी मा. श्री. जयंत काकतकर आदी मान्यवर तसेच ग्राहक व हितचिंतक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

बिबवेवाडी शाखा शॉप नं. २४ ते २७, रासकर पॅलेस, तळमजला, सीटीएस नं. ६९२, चिंतामणीनगर भाग २ शेजारी, हॉटेल जयपूर गार्डनसमोर, बिबवेवाडी, पुणे ४११ ०३७ येथे सुरू करण्यात आली असून या शाखेच्या माध्यमातून ग्राहकांना इंटरनेट बँकिंग, मोबाइल बँकिंग, एनिवेअर बँकिंग, NEFT, RTGS, विमा आदी सेवा उपलब्ध आहेत. या सेवा सुविधांचा ग्राहकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन बँकेचे अध्यक्ष संजय लेले यांनी या वेळी केले. प्रमुख पाहुणे, मान्यवर खातेदार आणि हितचिंतकांचा याप्रसंगी बँकेच्या वतीने सत्कार करण्यात आला.

श्री. जयंत काकतकर यांनी प्रास्ताविक केले. उपाध्यक्ष श्री. जगदीश कदम यांनी बँकेच्या प्रगतीचा आढावा घेतला. श्री. विनय दुनाखे यांनी सूत्रसंचालन केले. बिबवेवाडी शाखेचे शाखा व्यवस्थापक श्री. निलेश देशपांडे यांनी आभार मानले.


# अभिनंदन व हार्दिक शुभेच्छा!

## सेवक डॉ. सुनिल भंडगे यांची लोकशाहीर अण्णा भाऊ साठे अध्यासनावर निवड



सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या लोकशाहीर अण्णा भाऊ साठे अध्यासनावर प्राध्यापक प्रमुखपदी म्हणून आपल्या बँकेचे सेवक डॉ. सुनिल दादोजी भंडगे यांची निवड झाली आहे. प्रा. डॉ. सुनिल भंडगे यांचे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातून एम. कॉम., एम. फिल. आणि पीएच. डी. पर्यंतचे शिक्षण झाले असून त्यांचा 'दलित उद्योजकांचे व्यवसाय व औद्योगिक विषयातील योगदान-पश्चिम महाराष्ट्रातील निवडक दलित उद्योजकांचा अभ्यास' या विषयावर पीएच.डी. प्रबंध आहे. गेली १५ वर्षे ते महाराष्ट्रातील नामवंत अशा डेक्कन एज्युकेशनच्या नियामक मंडळावर संचालक म्हणून कार्यरत असून न्या. रानडे बालक मंदिर, नवीन मराठी शाळा, मा. स. गोळवलकर गुरुजी विद्यालय, हिंदुस्थान अँटीबायोटिक्स विद्यालय इ. शाळांवर अध्यक्ष म्हणून काम पाहत आहेत. डॉ. भंडगे यांनी बँकेच्या कर्मचारी संघटनेच्या अध्यक्षपदी काम केले आहे. प्रा. डॉ. भंडगे यांचे निवडीबद्दल शिक्षणमंत्री मा. विनोद तावडे, मा. महसूलमंत्री चंद्रकांतदादा पाटील, मा. उपकुलगुरू डॉ. एन. एस. उमराणी, प्राचार्य अनिरुद्ध देशपांडे, प्रा. डॉ. मुकुंद तापकीर, प्रा. डॉ. अनिल कुलकर्णी, डॉ. रामचंद्र देखणे, डॉ. राजेंद्र हिरेमठ, प्रा. डॉ. अनिल सहस्त्रबुद्धे, प्रा. डॉ. संदीप सांगळे, ॲड. किरण जावीर यांनी अभिनंदन केले आहे. बँक परिवारातर्फे डॉ. भंडगे यांचे अभिनंदन!

## वारजे-माळवाडी शाखेचे खातेदार श्री. दिनकर चौधरी यांना 'भारतरत्न सरदार वल्लभभाई पटेल राष्ट्ररत्न पुरस्कार' प्राप्त




पद्मश्री डॉ. मणिभाई देसाई मानव सेवा ट्रस्ट (नेहरू युवा केंद्र, युवक कल्याण, क्रीडा मंत्रालय भारत सरकार संलग्नित) च्या वतीने 'भारतरत्न सरदार वल्लभभाई पटेल राष्ट्ररत्न पुरस्कार २०१७', आपल्या वारजे-माळवाडी शाखेचे मान्यवर खातेदार श्री. दिनकर बळीराम चौधरी यांना प्रदान करण्यात आला आहे, हा पुरस्कार त्यांनी केलेल्या धार्मिक व सामाजिक कामाबद्दल प्रदान करण्यात आला. पुरस्काराचे वितरण ट्रस्टचे अध्यक्ष डॉ. रविंद्र भोळे यांचेहस्ते दि. ३१ ऑक्टो. २०१७ रोजी सावित्रीबाई फुले सांस्कृतिक भवन, पुणे येथे समारंभपूर्वक करण्यात आले. श्री. चौधरी हे समाजातील अनेक संस्था-संघटनेत अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव, संपर्क प्रमुख, कार्याध्यक्ष, संचालक, मार्गदर्शक अशा विविध जबाबदाऱ्या गेल्या २५ वर्षांपासून पार पाडत आहेत. श्री. चौधरी यांचे मनःपूर्वक अभिनंदन!

## भोर शाखेचे खातेदार बाळासाहेब शिंदे यांची खरेदी-विक्री समितीचे अध्यक्ष म्हणून निवड



भोर शाखेतील खातेदार, सभासद व स्थानिक सल्लागार सदस्य श्री. बाळासाहेब शिंदे यांची 'खरेदी-विक्री महासंघ भोर' या समितीवर नव्याने अध्यक्ष म्हणून ३ वर्षांकरिता निवड झाली आहे. त्यांचे हार्दिक अभिनंदन!

## डॉ. मुकुंद तापकीर यांची पद्मश्री विखे पाटील अध्यासनावर निवड



आपल्या बँकेचे माजी उपाकार्याध्यक्ष, एफ. सी. रोड शाखेचे खातेदार, सभासद व सहकार भारतीचे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष प्राचार्य श्री. डॉ. मुकुंद तापकीर यांची पुणे विद्यापीठातील पद्मश्री डॉ. विखे पाटील अध्यासनावर निवड झाली आहे. एफ. सी. रोड शाखेतर्फे दि. १/१/२०१८ रोजी सर्व सेवकांतर्फे पुष्पगुच्छ देऊन त्यांना सन्मानित करण्यात आले. डॉ. मुकुंद तापकीर यांचे मनःपूर्वक अभिनंदन!

## चि. गिरीश वैद्यचे स्पृहणीय यश



आपल्या एफ. सी. रोड शाखेतील सेवक श्री. रघुनाथ शंकर वैद्य यांचा मुलगा चि. गिरीश रघुनाथ वैद्य हा वयाच्या तेविसाव्या वर्षी चार्टर्ड अकौंटंटची परीक्षा पहिल्या अटेम्प्टमध्ये उत्तीर्ण झाला. त्याचे शालेय शिक्षण एम. आय. टी. शाळेतून झाले असून त्याने बी. कॉम. ची पदवी बी. एम. सी. सी. कॉलेजमधून घेतली. त्याने चार्टर्ड अकौंटंटसाठी आवश्यक असलेली आर्टिकलशिप पुण्यातील प्रथितयश चार्टर्ड अकौंटंट फर्म कीर्तने पंडितमधून पूर्ण केली. त्याचे मनःपूर्वक अभिनंदन व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा!

## अभिनंदन !!!

### बँकिंग परीक्षेतील यशाचे मानकरी.....

### केवायसी अँड अँटी मनी लॉन्ड्रींग परिक्षा

| नाव | शाखा/विभाग/हुद्दा | वर्ष |
|---|---|---|
| श्री. मनीष स. गोगटे | गुंतवणूक-लेखनिक | जाने. २०१८ |
| श्री. पांडुरंग ना. पढार | ऑडीट इन्स्पे.-वरिष्ठ अधिकारी | जाने. २०१८ |
| श्री. रोहित ल. जोशी | कोल्हापूर-लेखनिक | जाने. २०१८ |

### एनआयएसएम परिक्षा

| नाव | शाखा/विभाग/हुद्दा | वर्ष |
|---|---|---|
| कु. मधुरा मकरंद कर्वे | एनएसडीएल-लेखनिक | जाने. २०१८ |
| श्री. सुरेश नामदेव पराड | हडपसर-वरिष्ठ अधिकारी | जाने. २०१८ |
| श्री. नरेंद्र मु. देशपांडे | एनएसडीएल-चीफ ऑफिसर | मार्च २०१८ |

# सभासद अशोक जाधव यांच्या आत्मचरित्रास प्रथम क्रमांकाचा पुरस्कार जाहीर

इचलकरंजी शाखेचे सभासद खातेदार श्री. अशोक सखाराम जाधव हे इचलकरंजी येथील व्यंकटराव हायस्कूल येथे सहाय्यक शिक्षक म्हणून काम करीत आहेत. 'भंगार' या त्यांच्या आत्मचरित्राचे ज्येष्ठ समाजसेवक श्री. प्रकाश आमटे व डॉ. सौ. मंदाताई आमटे यांचे हस्ते प्रकाशन झाले होते. मनोविकास प्रकाशनतर्फे आत्मचरित्राच्या दोन आवृत्ती प्रकाशित झाल्या असून तिसरी आवृत्ती प्रकाशनाच्या टप्प्यावर आहे. सुमारे २००० वाचकांनी प्रती विकत घेतल्या आहेत. 'सुप्रभात साहित्य परिषद, मुंबई' यांचा उत्कृष्ट आत्मचरित्राचा प्रथम क्रमांकाचा पुरस्कार त्यांना जाहीर झाला आहे. जागतिक मराठी दिनानिमित्ताने महाराष्ट्र टाइम्सतर्फे आयोजित परिसंवादात नुकतीच मुंबई येथे त्यांची मुलाखत घेण्यात आली. इचलकरंजी शाखेतर्फे त्यांचा सत्कार करण्यात आला.



# 'जागतिक महिला दिन' ८ मार्च २०१८ बँकेच्या सर्व शाखांमध्ये उत्साहाने साजरा

### जागतिक महिला दिनानिमित्त 'जनता उद्योगिनी कर्ज योजना'

महिलांनी स्वतःच्या हक्कासाठी दिलेल्या लढ्याच्या स्मरणार्थ दरवर्षी ८ मार्च हा दिवस जागतिक महिला दिन म्हणून साजरा करण्यात येतो. आपल्या बुद्धीला, आत्मसन्मानाला स्त्रीने नवी दिशा दिली आहे, असे कोणतेही क्षेत्र नाही जिथे स्त्री नाही.

बँकिंग क्षेत्रामध्येसुद्धा महिलांचा मोठा सहभाग आहे. बँकेच्या सर्व शाखांमध्ये महिला दिवस अतिशय उत्साहाने साजरा केला जातो. बँकेच्या सर्व शाखांमध्ये या दिवशी विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. शाखांमधील महिला सेवक या कार्यक्रमांमध्ये हिरीरीने सहभाग घेतात. शाखांमध्ये या दिवशी सजावट केली जाते. रांगोळ्या काढल्या जातात. अतिशय मंगलमय वातावरण असते. महिला खातेदार, महिला सभासद तसेच विविध क्षेत्रांतील महिलांना घरी जाऊन आमंत्रणे दिली जातात. स्थानिक पातळीवर मेळावे आयोजित केले जातात. मा. संचालक, शाखांच्या स्थानिक सल्लागार समितीचे सभासद, बँकेचे पदाधिकारी तसेच मान्यवर व्यक्ती या मेळाव्यासाठी आवर्जून उपस्थित असतात. शाखा व्यवस्थापकामार्फत उपस्थित महिलांचे यथोचित स्वागत केले जाते. विविध क्षेत्रांत स्वतःचे स्थान निर्माण केलेल्या महिलांचा गौरव केला जातो. महिलांनी आर्थिकदृष्ट्या सक्षम व्हावे, स्वतःच्या पायावर उभे राहावे, यासाठी त्यांना मार्गदर्शन व सहकार्य केले जाते.

जागतिक महिला दिनानिमित्त आपल्या बँकेने 'जनता उद्योगिनी कर्ज योजना' या खास महिला नव उद्योजिकांकरिता नवीन योजनेचा शुभारंभ केला आहे. वय वर्षे २० ते ६५ पर्यंतच्या उद्योजक महिलांना प्रोत्साहन देण्याकरिता ७ वर्षे मुदतीच्या कालावधीची कर्ज वितरणाची योजना जाहीर केली आहे.

# टिळक रोड शाखेचे तीळगूळ समारंभाचे आयोजन



टिळक रोड शाखेने दि. १७ जानेवारी २०१८ रोजी महिला उद्योजिकांकरिता तीळगूळ समारंभ आयोजित केला. समारंभात प्रसिद्ध उद्योजिका सौ. वृंदा बाळ यांचे 'स्त्रीमधील उद्योजिका' या विषयावर मार्गदर्शनपर संवादाचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमास बँकेच्या मा. संचालिका सौ. मधुरा कसबेकर व सौ. गौरी कुंभोजकर उपस्थित होत्या. प्रमुख पाहुण्या म्हणून उद्योजिका सौ. वृंदा बाळ यांना आमंत्रित केले होते. तसेच बँकेच्या खातेदार आणि उद्योजिका सौ. अश्विनी देऊस्कर यांनाही विशेष आमंत्रित केले होते. कार्यक्रमास एकूण ४० महिला उद्योजिका उपस्थित होत्या.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला मा. शाखा व्यवस्थापक श्री. महेश च. काळे यांनी कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या सौ. वृंदा बाळ यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. स्नेहा कुलकर्णी यांनी केले. सौ. अवंती तिताडे यांनी प्रस्तावना केली. सौ. निलीमा दाणी यांनी कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या सौ. बाळ यांचा परिचय करून देताना सौ. बाळ यांनी नोकरीतून सुरुवात करून स्वतःची उद्योजिका म्हणून ओळख निर्माण केल्याचे सांगितले.

कार्यक्रमाच्या मुख्य भागात सौ. अश्विनी देऊस्कर यांनी सौ. बाळ यांची संवादपर मुलाखत घेतली. महिलांनी व्यवसाय करताना आपले प्राधान्यक्रम ठरवून घेतले पाहिजेत आणि येईल त्या प्रत्येक संधीचा बरोबर उपयोग करून घेतला पाहिजे, जेणेकरून व्यवसायात यश मिळवणे सहज शक्य आहे, असे त्यांनी सांगितले. मा. संचालिका सौ. कसबेकर यांनी आपले मनोगत व्यक्त केले. सुप्रिया कुलकर्णी यांनी सर्व पाहुण्यांचे आभार मानले. कु. वरदा देशपांडे यांचे पसायदान झाले. कार्यक्रमाची सांगता हळदीकुंकू व अल्पोपाहाराने झाली.

### शाखा वर्धापन दिनाच्या शुभेच्छा! (माहे एप्रिल ते जून)

| | | | |
|---|---|---|---|
| अंबाजोगाई | १मे | माखजन | २३ मे |
| भोर | ६ मे | संगमेश्वर | २३ मे |
| भवानी पेठ | ९ मे | पावस | २३ मे |
| घोडनदी | १३ मे | गोरेगाव | २५ मे |
| विलेपार्ले | १४ मे | अहमदनगर | २५ मे |
| गिरगाव | १४ मे | कात्रज | २८ मे |
| मार्केटयार्ड | २१ मे | फर्ग्युसन रोड | ३ जून |
| रत्नागिरी | २३ मे | चिंचवड गाव | १० जून |
| शिवाजीनगर रत्ना. | २३ मे | पिंपरी | १४ जून |
| साखरपा | २३ मे | फोर्ट | २८ जून |
| देवरुख | २३ मे | | |

## अभिनंदन व हार्दिक शुभेच्छा!

### प्रिती शानभागला माध्यमिक शिष्यवृत्ती प्राप्त



बँकेच्या सी.आय.सी.डी. विभागातील सेवक श्री. प्रसाद शानभाग यांची कन्या कु. प्रिती प्रसाद शानभाग ही इ. ८ वी च्या स्कॉलरशिप परीक्षेत (माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा) पुणे जिल्हा गुणवत्ता यादीत आलेली आहे. तसेच ती महाराष्ट्र प्रज्ञा शोध (Maharashtra Talent Search Examination) परीक्षेत भोर तालुक्यात पहिली आलेली आहे. चि. प्रिती व तिच्या पालकांचे बँक परिवारातर्फे हार्दिक अभिनंदन!

### सभासद, खातेदार सुखदेव चव्हाण यांची सरपंच पदासाठी निवड



आपल्या वारजे-माळवाडी शाखेचे सभासद व खातेदार श्री. सुखदेव मच्छिंद्र चव्हाण यांची दि. १७/१०/२०१७ रोजी ग्रामपंचायत बावची, तालुका मंगळवेढे, जिल्हा सोलापूर येथून सरपंचपदी निवड झाली आहे, त्यांचे हार्दिक अभिनंदन!

### समीर नागवेकर यांची शासनातर्फे विशेष कार्यकारी अधिकारी म्हणून निवड



कांदिवली (प.) शाखेतील स्पे. असिस्टंट श्री. समीर हरिश्चंद्र नागवेकर यांची महाराष्ट्र शासनातर्फे विशेष कार्यकारी अधिकारी (SEO) म्हणून नेमणूक करण्यात आली आहे, त्यांचे हार्दिक अभिनंदन!

### जालना शाखेचे खातेदार सुरज खेडेकर यांचे प्रामाणिकपणाबद्दल कौतुक

दि. ८/३/२०१८ रोजी जालना शाखेच्या ATM मध्ये अज्ञान व्यक्तीने ATM वापरले असता काही तांत्रिक कारणास्तव ATM मशीनमधून पैसे येण्यास उशीर झाल्याने सदरील व्यक्ती तेथून निघून गेली. त्यानंतर जालना शाखेचे खातेदार श्री. सुरज खेडेकर हे पैसे काढण्यासाठी आले असता त्यांना ATM मशीनमध्ये रक्कम रु. २,०००/- मिळाली. ती त्यांनी प्रामाणिकपणे शाखेचे सहाय्यक शाखा व्यवस्थापक यांच्याकडे दिली. त्याबद्दल जालना शाखेच्या वतीने शाखेचे खातेदार श्री. सुरज खेडेकर यांचे रोखपाल श्री. श्रीराम वैद्य व मार्केटिंग प्रतिनिधी श्री. विजय कदम यांच्या हस्ते शाल व पुष्पगुच्छ देऊन कौतुक करण्यात आले.

### अंक ४ मधील चुकीसाठी दिलगिरी

सन २०१७ मध्ये प्रसिद्ध झालेल्या अंक ४ मध्ये 'मातोश्री वृद्धाश्रम येथे इच्छानिधी बाबत तज्ज्ञांचे मार्गदर्शन' या कर्वेनगर, पुणे येथे झालेल्या कार्यक्रमाच्या बातमीसोबत छापून आलेला फोटो त्या कार्यक्रमाचा नसून लातूर येथे झालेल्या कार्यक्रमाचा होता. सदर चुकीबद्दल दिलगिरी व्यक्त करीत आहोत.

– संपादक

### औरंगाबाद शाखा मार्केटिंग संपर्क अभियानांतर्गत रुग्णालय कर्मचाऱ्यांना Banking Awarness चे प्रशिक्षण



औरंगाबाद शाखेतील मार्केटिंग संपर्क अभियानांतर्गत डॉ. हेडगेवार रुग्णालय येथील कर्मचाऱ्यांना Banking Awarness या विषयास अनुसरून प्रशिक्षण दि.०३/०३/२०१८ रोजी देण्यात आले. शाखेतील अधिकारी श्री. प्रमोद नशिराबादकर आणि श्री. शरद हिरळकर यांनी दोन सत्रांत रुग्णालयातील कर्मचाऱ्यांना General Banking बाबत अवगत करून बँकेच्या माध्यमातून आर्थिक व्यवहार करण्याविषयी जागृती निर्माण केली. त्यांचे सोबत शाखेतील लेखनिक श्री मल्लीनाथ साखरे हे उपस्थित होते त्यांनी बँकेच्या विविध Technobase Services बाबत माहिती दिली.

सदर सत्रात सेव्हिंग / करंट तसेच विविध मुदत ठेव योजनांविषयी माहिती सांगून खात्यावरील व्यवहार करताना कोणकोणती काळजी घ्यावी, याबाबत सविस्तर विश्लेषण करण्यात आले आणि कोणताही आर्थिक व्यवहार बँकेच्या माध्यमातून करण्याबाबतचे महत्त्व विशद केले गेले. याशिवाय KYC व विविध कर्ज योजनांची माहिती सांगून सर्व कर्ज प्रक्रियेत कर्जदार तसेच जामीनदार यांच्या जबाबदारीविषयी विश्लेषण केले गेले. शेवटी Religare हेल्थ इन्शुअरन्सचे प्रतिनिधी श्री. भालेराव यांनी विविध विमा योजनांची माहिती / महत्व सांगितले. या प्रशिक्षण कार्यक्रमास जवळपास २०० कर्मचारी उपस्थित होते.

### हडपसर शाखेमध्ये फुप्फुस कार्यक्षमता तपासणी शिबिर संपन्न

नुकतेच हडपसर शाखेमध्ये 'चेस्ट रिसर्च फौंडेशन कल्याणीनगर पुणे' डॉ. गोविंद नरके (एमडी) व त्यांचे सहकारी यांच्या सहकार्याने फुप्फुस कार्यक्षमता तपासणी शिबिर संपन्न झाले. या तपासणी शिबिराचे उद्घाटन बँकेचे संचालक मा. श्री. किशोरभाई शहा यांच्या हस्ते झाले. सध्याची बदललेली जीवनशैली व वाढत्या प्रदुषणाच्या त्रासामुळे अशाप्रकारच्या शिबिराचे महत्व अधिक आहे, असे प्रतिपादन शाखा व्यवस्थापक श्री. सुरेश पराड यांनी प्रास्ताविकात केले. त्यामुळे या शिबिराचा लाभ जास्तीत जास्त ग्राहकांनी करुन घेण्याची विनंती त्यांनी केली.

हे शिबिर यशस्वी करण्यासाठी शाखेचे स्थानिक सल्लागार समिती सदस्य डॉ. नितिन शिंदे यांनी प्रथमपासून प्रयत्न करून शिबिर यशस्वी केले. कार्यक्रमास स्थानिक सल्लागार समिती सदस्य श्री. महेंद्र तुपे उपस्थित होते. मा. श्री. किशोर भाई शहा यांनी समारोपपर भाषणामध्ये जनता बँक नेहमीच सामाजिक उपक्रमांमध्ये अग्रेसर असते, त्यासाठीच सर्व खातेदार, हितचिंतक, सभासद यांच्या आरोग्याच्या दृष्टीने सदर फुप्फुस कार्यक्षमता तपासणी शिबिराचे आयोजन केल्याचे सांगितले.

## बँकेच्या पुणे स्टाफ वेल्फेअर असोसिएशन कोकण विभागाचे स्नेहसंमेलन उत्साहात संपन्न






बँक स्टाफ वेल्फेअर असोसिएशनचे कोकण विभागाचे स्नेहसंमेलन दि. २१ जानेवारी २०१८ रोजी पवित्र करवीर नगरीत पार पडले. कार्यक्रमास बँकेचे अध्यक्ष मा. श्री. संजय लेले, उपाध्यक्ष मा. श्री. जगदीश कदम, मुख्य कार्यकारी अधिकारी मा. श्री. जयंत काकतकर, संपर्क संचालक मा. श्री. विद्यानंद देवधर, संचालक मा. श्री. विजय भावे व मा. श्री. महेंद्र पवार उपस्थित होते. तसेच असोसिएशनचे अध्यक्ष मा. श्री. विजय निल्दावार उपस्थित होते. मुंबई विभाग प्रतिनिधी श्री. शैलेश घोसाळकर तसेच असोसिएशनचे अन्य पदाधिकारी व कला क्रीडा मंडळाचे अध्यक्ष श्री. अभिजित मकाशीर हेही उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने झाली. कार्यक्रमाचा उद्देश व पार्श्वभूमी विभाग प्रतिनिधी श्री. चंद्रकांत माने यांनी प्रास्ताविकामध्ये सांगितली. तदनंतर कोल्हापूर शाखेतील निवृत्त सेवक श्री. राजेंद्र बांबुळकर यांची ‘ह्युमॅनिटी’ या विषयावरची शॉर्ट फिल्म दाखवण्यात आली. त्यानंतर माजी सेवक श्री. हेमंत महाराव यांचा मिमिक्री कार्यक्रम झाला व नंतर मुख्य आकर्षण प्रा. श्री. राहुल कुलकर्णी यांचा ‘हसवेगिरी’ हा एकपात्री कार्यक्रम पार पडला. सदर कार्यक्रमाला दिलखुलासपणे सर्वांनी दाद दिली.

नंतरच्या सत्रात स्नेहसंमेलनानिमित्त झालेल्या स्पर्धांचा बक्षीस समारंभ पार पडला. तत्पूर्वी बँकेचे मा. अध्यक्ष व मा. संपर्क संचालक यांचे मार्गदर्शन झाले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. मंगेश राव व आभारप्रदर्शन श्री. अतुल क्षीरसागर यांनी केले. वैयक्तिक पद्य श्री. विजय पुजारी व पसायदान कु. चैत्राली नाईक यांनी सादर केले. तदनंतर श्री. राम भोळे यांचा संगीताचा कार्यक्रम झाला.

## करिअरबाबत सकारात्मक दृष्टिकोन हवा



करिअर घडवताना सकारात्मक दृष्टिकोनातून विचार करून पुढे जावे. आपल्या मतांशी आपण ठाम राहिल्यास आत्मविश्वास वाढतो. त्याला संस्काराची जोड देऊन मार्गक्रमण करता येते, असे अमृता मुकुंद प्रभुणे उर्फ अमृता घळसासी यां वकील महिलेचे विचार आहेत.

कुठल्याही नवीन गोष्टीची सुरुवात ही अडचणींमधूनच होते. पण त्या अडचणींवर मात करण्यासाठी आपले संस्कार व परमेश्वरावरची श्रद्धा कामी येते. मानसिक संतुलन न ढळण्यासाठी श्रद्धा हवी आणि अथक परिश्रम केल्याने ध्रुवासारखे अढळपदही मिळू शकते. कोणीतरी प्रेरणा देऊन जाते. ही प्रेरणाच कामी येते. अशा वेळी अनुकरण न करता स्वतःविषयी ठाम राहायचे. करिअर करताना अथवा सर्वांगीण विकास साधताना कायद्याची माहिती असणे गरजेचे आहे. कायदे आपल्या मनालाही नियंत्रित करतात. कारण त्यानंतरची कृती ही आवश्यक असते. कुठल्याही क्षेत्रात पदार्पण करून पूर्णत्वाला पोहोचेपर्यंत जडणघडण, संस्कार, श्रद्धा या महत्त्वाच्या गोष्टीच उपयोगी पडतात. महिलांनी तर या सर्व गोष्टींची सांगड अवश्य घालावयास हवी.

डॉक्टर आणि वकील यांचेपासून महिलांनी काही लपवू नये, असे अमृताताई सांगतात. महिलांसंबंधीचे सर्व कायदे हे महिलांनी जाणून घेतले पाहिजेत. आज विविध ठिकाणी नोकरी करताना महिलांना विविध अत्याचारांना सामोरे जावे लागते. पण कायद्याचा विचार करून त्यास योग्य तो मार्ग सापडतो.

जागरूकता, सजगता, दक्षता, ज्ञान, सखोल अभ्यास या गोष्टींची आज महिलांना खूप आवश्यकता आहे. कठोर निर्णय घेणे आणि मार्ग काढणे याबाबत जागरुरू असले पाहिजे. सकारात्मक जीवनाची वाटचाल असल्यास आत्मविश्वास व श्रद्धेने पुढे जाता येते. स्वतःच्या मनाचा आत्मविश्वास आणि अनुभव हे पक्के असल्यास निर्भीडता येते. कुठल्याही क्षेत्रात कष्ट करायचे असतील, तर कणखर मनाने निर्धार करून पुढे चला. अडचणींना, संकटांना स्वतः सामोरेंजाण्याचा निश्चय करा. यासाठी संपर्क महत्वाचा. निखळ मैत्री महत्त्वाची. कायद्याची चौकट महत्त्वाची. महिलांवरील अत्याचार, वाढती समस्या याचे निराकरण करताना आपले ज्ञान दुसऱ्यालाही उपयोगी ठरते.

आपण दुसऱ्यासाठी काही गोष्टींची मदत निश्चित करू शकतो. प्रत्येक गोष्टींमध्ये विविधता असते. ती आपण जाणून घेतल्यास कायदा सुलभ होतो व न्याय मिळतो. खंबीरपणे स्वावलंबनाचा मार्ग स्वीकारल्यास जीवन सुसह्य होते.

**सौ. अमृता शरद घळसासी**
BSL-LLM, DLL & LW, DIPR, JAIIB

## माहे जानेवारी ते मार्च २०१८ या कालावधीत सेवानिवृत्त झालेले सेवक

| नाव | हुद्दा | शाखा/विभाग |
|---|---|---|
| श्री. श्रीराम विष्णू आपटे | उप.महाव्यवस्थापक | हिशोब/ऑडिट |
| श्री. राजेंद्र व. कदम | कनिष्ठ अधिकारी | सीआयसीडी |
| श्री. संजय प्र. भिडे | कनिष्ठ अधिकारी | कर्वेरोड |
| श्री. अविनाश ज. गपचूप | लेखनिक | चिंचवड गाव |
| श्री. हरीपंत व्यं. पाटील | लेखनिक | लातूर |

| नाव | हुद्दा | शाखा/विभाग |
|---|---|---|
| श्री. धनंजय अ. देशपांडे | लेखनिक | क्रेडिट सेल पुणे |
| श्री. आनंद आ. ताडला | लेखनिक | कात्रज |
| श्री. सुहास स. साने | लेखनिक | भोर |
| श्री. सुनिल गो. जोशी | लेखनिक | मोशी |

# इचलकरंजी व जवाहरनगर शाखेतील सेवकांसाठी आरोग्यविषयक व्याख्यानाचे आयोजन

दिनांक ५ डिसेंबर २०१७ रोजी बँकेच्या इचलकरंजी व जवाहरनगर शाखेतील सेवकांसाठी डॉ. सौ. संध्या ढवळे यांचे 'बँक कर्मचाऱ्यांचे बैठे कामकाज, त्यातून उद्‌भवणाऱ्या व्याधी व त्यांवरील उपाय' या विषयावर व्याख्यान घेण्यात आले. इचलकरंजी शाखेमध्ये सायं. ६ वाजता सदर कार्यक्रमास दोन्ही शाखांतील सेवक उपस्थित होते. याप्रसंगी जनता बँक पुणे, स्टाफ वेल्फेअर असोसिएशनचे उपाध्यक्ष श्री. चंद्रकांत माने व वसुली विभागातील अधिकारी श्री. रमेश सोरटे उपस्थित होते.

जवाहरनगर शाखेचे सहाय्यक शाखा व्यवस्थापक श्री. संजीव खळदकर यांनी प्रस्तावना करुन वक्त्यांचा परिचय करून दिला. तसेच हा कार्यक्रम घेण्यामागचा उद्देश याविषयी माहिती दिली. सध्याच्या काळात बँकिंग क्षेत्रात काम करीत असताना येणारा तणाव, त्याचा सेवकांवर होणारा परिणाम व साहजिकच त्यामुळे बँकेच्या व्यवसायावर होणारा परिणाम या सर्वांसाठी शारीरिक, मानसिक संतुलन साधणे अत्यावश्यक आहे असे श्री. संजीव खळदकर यांनी सांगितले.

इचलकरंजी शाखेचे शाखा व्यवस्थापक श्री. श्रीधर विसाळ यांनी पुष्पगुच्छ देऊन वक्त्यांचे स्वागत केले. त्यानंतर मुख्य कार्यक्रमास सुरुवात झाली. डॉ. सौ. ढवळे यांनी आपल्या देशात आरोग्य साक्षरता खूपच कमी आहे, याविषयी खंत व्यक्त केली. ''सध्याच्या धकाधकीच्या जीवनात सर्वांनी आरोग्याविषयी जागरूक राहणे आवश्यक बनले आहे'', असे त्या म्हणाल्या.

आरोग्याविषयी माहिती सांगताना डॉ. सौ. ढवळे यांनी प्रथम व्यायाम म्हणजे काय, याची माहिती सांगितली. तसेच आजार म्हणजे काय, याचीही माहिती सांगितली. आजाराचे शारीरिक, मानसिक व सामाजिक असे तीन प्रकार असतात असेही सांगितले.

बँकेमध्ये किंवा घरामध्ये काम करीत असताना निर्माण होणाऱ्या शारीरिक व्याधी व आजार कशा प्रकारे निर्माण होतात, तसेच ताणतणाव, दगदगीमुळे मानसिक व्याधी व आजार कशा प्रकारे निर्माण होतात आणि आजार किंवा व्याधी निर्माण झाल्यावर सामाजिक दडपणामुळे त्याकडे दुर्लक्ष केल्याने व्याधी किंवा आजार कशा प्रकारे वाढतो, याची डॉ. सौ. ढवळे यांनी माहिती दिली.

लवचिकता वाढविणारे व्यायाम, ताकदीचे व्यायाम, योगासने असे व्यायामाचे तीन प्रकार आहेत. फक्त चालण्याचा व्यायाम केला म्हणजे पूर्णत्व नसते. त्याचप्रमाणे रोज एकाच प्रकारचा व्यायाम करू नये, असेही त्यांनी सांगितले. जसे आपण जेवताना रोज एकाच प्रकारची भाजी खात नाही, अगदी त्याप्रमाणे रोज एकाच प्रकारचा व्यायाम करू नये. कधी चालण्याचा व्यायाम, कधी योगासने, प्राणायाम, तर कधी ताकदीचे व्यायाम करावेत तसेच कधी लवचिकता वाढविणारे व्यायाम करावेत, असे डॉ. सौ. ढवळे यांनी सांगितले.

कार्यक्रमात डॉ. सौ. ढवळे यांनी गुडघेदुखीसाठीच्या व्यायामाचे प्रात्यक्षिक दाखविले. तसेच अनेकांच्या शंकांचे निरसन करण्यासाठी प्रत्यक्ष व्यायाम करून घेतले. श्री. संजय चौगुले यांनी आभार प्रदर्शन केले.

## दिनदर्शिकेबद्दल खातेदार नारगोलकरांकडून कौतुक व सूचना

**खातेदारांचे अंतरंग**

आपल्या बँकेच्या सहकारनगर शाखेचा मी खातेदार आहे. १२ पौष, १९३९ या दिनी मी बँकेत गेलो असता मला आपल्या बँकेची दिनदर्शिका मिळाली. त्याच्या पहिल्या पानावर आपण भारतीय सौर कालगणना म्हणून जो लेख प्रसिद्ध केला आहे. त्याबद्दल आपले मनःपुर्वक अभिनंदन!

त्या लेखाबद्दल आपल्याला अशी विनंती आहे की, त्या लेखात स्वातंत्र्यपूर्व काळात कालगणना सुधारणेच्या दृष्टीने काम करणाऱ्यांची नावे आहेत. त्यात स्वा. सावरकरांचे नांव असावयास पाहिजे होते, कारण स्वदेश सामर्थ्य संपन्न व्हायला प्रथम भारतीयांतली एकात्मतेची भावना प्रबळ केली पाहिजे. त्यासाठी एक राष्ट्रीय संविधान, एक राष्ट्रभाषा, एक राष्ट्रीय लिपी इत्यादी साधने जशी आवश्यक तसेच एकच राष्ट्रीय पंचांग म्हणजे कालदर्शक (कॅलेंडर) असणेही आवश्यक आहे. ही गोष्ट सावरकरांनी मे १९०७ मध्ये लंडनमध्ये असतानाच आपल्या अभिनव भारताच्या सहकाऱ्यांच्या निदर्शनास आणून दिली होती. पण ते नेमकं कस असाव याचा साधक बाधक विचार व्हायला स्वातंत्र्याचा उदय झाल्यावरच अनुकूल काळ आला. पण स्वातंत्र्यानंतर चार वर्षे सरकारचे लक्ष नाही हे पाहून स्वा. सावरकरांनी १९५१ च्या मे मध्ये केसरीच्या अंकात 'भारतीय पंचांगाचे सूतोवाच' हा लेख लिहून तिकडे सर्वांचे लख वेधले आणि १९५२ मध्ये कॅलेंडर रिफॉर्म कमिटीची स्थापना झाली. त्याच बरोबर त्यांनी हे पण सांगितले की धार्मिक आचारासाठी आपापली पंचांगे वापरावीत पण देशाच्या राष्ट्रीय व्यवहारासाठी राष्ट्रीय कालदर्शकच सर्वांनी वापरले पाहिजे. असे स्वा. सावरकारांचे कालदर्शकासाठी कार्य व विचार होते म्हणून त्यांच्या नावाचा उल्लेख असावा ही विनंती.

**– श्री. विद्याधरपंत नारगोलकर**

## जनता बँकेच्या बोरिवली शाखेचे नूतन वास्तूत स्थलांतर



बँकेच्या बोरिवली (प.) शाखेचे रविवार दिनांक २५ मार्च २०१८ रोजी नूतन वास्तूत स्थलांतर करण्यात आले. या नूतनीकृत शाखेचे उद्‌घाटन बँकेचे संचालक श्री. प्रभाकर परांजपे यांच्या हस्ते, तर येथील एटीएम केंद्राचे उद्‌घाटन बँकेचे संचालक मा. श्री. मोहन फडके यांच्या हस्ते करण्यात आले. उद्‌घाटनप्रसंगी बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मा. श्री. जयंत काकतकर, वरिष्ठ अधिकारी, मान्यवर ग्राहक व हितचिंतक मोठ्या संख्येने उपस्थित होते. बँकेची बोरिवली पश्चिम शाखा प्लॉट नं. १८, सीटीएस ५३१-५३२, नंदनंदन भवन, सोडावाला लेन, बोरिवली (प), मुंबई ४०००९२ येथे स्थलांतरित करण्यात आली असून या शाखेच्या माध्यमातून इंटरनेट बँकिंग, मोबाइल बँकिंग, एनिवेअर बँकिंग, NEFT, RTGS, विमा आदी सेवा पुरविल्या जाणार आहेत. या सेवा-सुविधांचा या परिसरातील ग्राहकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन बँकेचे अध्यक्ष मा. श्री. संजय लेले यांनी या वेळी केले. मान्यवर खातेदार आणि हितचिंतकांचा याप्रसंगी बँकेच्या वतीने सत्कार करण्यात आला.



# आनंदाची पाठशाळा : ‘ओळखा स्वत:ला, घडवा स्वत:ला’

## ओळख स्वत:ची


कल्पनामुळे मला एक उत्तम उदाहरण मिळाले. शाळेत असताना इच्छा असेल आणि आवड असेल, तर व्यक्तिमत्त्व कसे विकसित होते याचे उत्तम उदाहरण तिच्यात दिसले.

या ओळखीच्या निमित्ताने माझा उद्देश साध्य झाला होता. दोन्ही प्रकारची मुले समोर होती. उत्तम प्रगती साधणारी, तर फक्त दरवर्षी पास होणे एवढेच उद्दिष्ट ठेवणारी आणि स्वत:ची प्रगती साधण्याची एक उत्तम संधी दवडणारी.

मी आता पुढे काय सांगणार आहे याची उत्सुकता सगळ्यांना वाटत होती.

‘मित्रांनो, तुम्ही या दोघांनी स्वत:ची करून दिलेली ओळख ऐकलीत.’

‘मी कॉलेजात कार्यरत असताना मला अनेकदा निरनिराळ्या ठिकाणी इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती घ्यायला जावे लागे. बऱ्याचदा या मुलाखती एम.बी.ए. कोर्सच्या प्रवेशासाठी किंवा एखाद्या प्रशिक्षण वर्गासाठी असत. तसेच नोकरीसाठी निवड करावी म्हणून असत. अजूनही मी काही ठिकाणी अशा कामासाठी जातो. खरे सांगायचे तर अशा अनुभवातून मलाही मुलांबद्दल खूप माहिती मिळते. उमेदवारांची मानसिकता कशी आहे, त्यांची ज्ञान आणि कार्यकौशल्याची पातळी कशी आहे, त्यांची सर्वांगीण प्रगती झाली आहे का, त्यांच्या मनात संभ्रम आहे का, त्यांचे भाषा कौशल्य कसे आहे, त्यांचे सामाजिक भान कसे आहे, त्यांना इतरांशी मिळून मिसळून वागता येते का, इत्यादी अनेक प्रश्नांची उत्तरे मी मुलाखतीतून जाणून घेण्याचा प्रयत्न करतो. किंबहुना तेच तर मुलाखत घेण्यामागचे उद्दिष्ट असते. या मुलाखतींद्वारे अनेक वेगवेगळ्या प्रकरची मुले अभ्यासता येतात. या बाबतीतले काही अनुभव




**प्रा. डॉ. श्रीधर चितळे व प्रा. डॉ. चंद्रशेखर चितळे लिखित ‘ओळखा स्वत:ला घडवा स्वत:ला’ या पुस्तकातील वेचक, वेधक व रोचक भाग क्रमशः प्रसिद्ध करीत आहोत.**

मी तुम्हाला सांगणार आहे. कारण आज ना उद्या तुम्हालाही अशा प्रकरच्या मुलाखतींना सामोरे जावे लागणार आहे हे निश्चित.

अशा मुलाखतींच्या दरम्यान ‘स्वत:ची ओळख करून द्या’, असा पहिलाच प्रश्न उमेदवारांना नेहमी विचारला जातो.

हा प्रश्न विचारला की ठरावीक उत्तर नक्कीच मिळते. ती व्यक्ती प्रथम आपले नाव सांगते, त्यानंतर अर्थातच शिक्षण काय आहे, कोणत्या महाविद्यालयातून शिक्षण झाले ते सांगते, अगदी प्रत्येक महत्त्वाच्या टप्प्यावर मिळालेले मार्कसुद्धा सांगते. राहण्याचे ठिकाण सांगते, काही उद्योग किंवा नोकरी असेल तर त्याबाबत सांगते आणि बऱ्याचदा गाडी इथेच थांबते. हे वारंवार प्रत्ययास येते.

मित्रांनो, तुम्हा सर्वांना यशस्वी व्हावयाचे आहे. यशस्वी जीवनाचे सर्व मापदंड तुम्हाला माहिती आहेत. फक्त यशस्वी होण्याचा मार्ग कोणता निवडावा या विषयी बहुधा सर्वांच्याच मनात संदेह आहे, खरे ना? या प्रश्नावर सगळ्यांनी मना डोलावल्या. ‘मग सर्वप्रथम आपण खऱ्या अर्थाने आपली स्वत:ची ओळख करून घेणे जरूरीचे आहे. आता आपण ही स्वत:ची ओळख कशी करून घ्यावी हे पाहू.’

**स्वत:ची ओळख करून घेण्याची सुरुवात**

‘आपण क्षमता, कल, बुद्धिमत्ता यांबाबत जाणून घेतले आहेच. तुमच्या निरीक्षणातून तुम्हाला स्वत:च्या अंगभूत क्षमतांबाबत माहिती करून घेता येईल किंवा एखाद्या समुपदेशन करणाऱ्या संस्थेमधून स्वत:ची कलचाचणी करून घेता येईल. मार्ग कोणताही असो, **तुमच्या क्षमता तुम्हाला कळणे ही स्वत:ची ओळख करून घेण्याची पहिली पायरी आहे.** तसेच तुमचा कल कोणत्या गोष्टींकडे आहे किंवा नाही हेही तुमच्या लक्षात येईल. या संदर्भात थोडा आणखी खुलासा करून घेऊ.

उदाहरणार्थ, समजा रमेशने क्षमता आणि कलचाचणी करून घेतली व त्याला कलमापन गुणपत्रिकेद्वारे त्याचा कल कोणत्या गोष्टीत आहे आणि कोणकोणत्या क्षमता त्याच्यामध्ये आहेत, याबाबत माहिती मिळाली.

समजा त्याची विचार करण्याची क्षमता उत्तम आहे, तर्कशुद्ध विचार करण्याची क्षमता चांगली आहे, भाषाकौशल्य चांगले आहे. शब्दसंग्रह चांगला आहे. सामाजिक क्षमता (भान) सुधारण्याची गरज आहे. कलात्मक क्षमता अत्युत्तम आहे. गणिती क्षमता चांगली आहे, त्रिमितीमध्ये विचार करण्याची क्षमता उत्तम आहे तसेच ज्ञान संपादन करण्याकडे त्याचा ओढा आहे. व्यवहारज्ञान बरे आहे. सामाजिक भान वाढविण्याची गरज आहे. महत्वाकांक्षा वाढविण्यास वाव आहे, कलात्मक गोष्टींमध्ये उत्तम कल आहे, आत्मविश्वास कमी आहे तो वाढवायची गरज आहे. असेही त्याला कळले.

‘सर, या उदाहरणामध्ये तुम्ही काही क्षमतांचा ‘बरी आहे’ किंवा ‘चांगली आहे’ असा उल्लेख केलात तर काही ठिकाणी वाढविण्यास वाव आहे असा उल्लेख केलात याचा अर्थ आम्हाला समजावून सांगा. हे असे निष्कर्ष काय सांगतात आणि आपण त्यातून काय समजायचे हेही सांगा.’ रमेश म्हणाला.

‘सर, माझ्या माहितीप्रमाणे आमच्यापैकी कोणाचीही कलचाचणी झालेली नाही मग आता आम्हाला आमचा कल कसा जाणून घेता येईल?’ गणेश म्हणाला.

‘सर, मी समाजशास्त्राची पदवीधर आहे आणि आता माझ्या विषयात पुढे आणखी काही करू इच्छिते तर मग मी कलचाचणी करून घ्यावी का?’ वंदनाचा प्रश्न आला.

मित्रांनो, तुमच्या प्रश्नांची उत्तरे सोप्या शब्दांत देतो.

‘आपण कोणतीही गोष्ट मापून घेण्याचे ठरवतो तेव्हा त्याला काही तरी परिमाण असावे लागते हे तुम्ही जाणताच. क्षमतांच्या बाबतीत किंवा कल मापनाच्या बाबतीतपण असे परिणाम आपल्याला लक्षात घ्यावे लागतील. कल, क्षमता या गोष्टी तुलनात्मक असल्याने परिमाणही तुलनात्मक घ्यावे लागते. अत्युत्तम (outstanding), सर्वोत्तम (excellent), उत्तम (very good), चांगले/बरे (good), सर्वसामान्य (average), सुधारण्यास वाव (needs improvement), खूप कमी (low) अशी उतरत्या क्रमाने उतरंड मांडली जाते. हे निष्कर्ष तुलनात्मक असतात. म्हणजेच तुमच्या वयोगटाचा, शैक्षणिक प्रगतीचा, सामाजिक परिस्थितीचा, आर्थिक स्थितीचा विचार करून कलचाचण्यांचे निष्कर्ष प्रमाणित केलेले असतात (validation, standardization). अशा प्रमाणित केलेल्या चाचणीद्वारे तुमचे निष्कर्ष काढतात.’

**क्रमशः**

## चिंचवड स्टेशन शाखेतर्फे Jet Pay या मोबाइल ॲप्लिकेशन प्रसिद्धीसाठी कार्यक्रमाचे आयोजन

सूर्योदय ग्रुप तळजाई टेकडी, सिंहगड रस्ता या संस्थेतर्फे रथसप्तमीनिमित्त दरवर्षी सूर्यनमस्कार घालण्याचा संकल्प केला जातो. चालू वर्षी या ग्रुपतर्फे २५००० सूर्यनमस्कार घालण्याचा संकल्प केला होता व सदरचा कार्यक्रम पु. ल. देशपांडे उद्यान, सिंहगड रोड येथे रविवार दि. २८ जानेवारी २०१८ रोजी आयोजित करण्यात आला होता.

शाखेतील सेवक श्री. अंकुश भरम हे सूर्योदय ग्रुपचे संस्थापक-सदस्य आहेत. यावर्षी या कार्यक्रमासाठी आपल्या बँकेचे मा. अध्यक्ष श्री. संजय लेले यांना प्रमुख अतिथी म्हणून निमंत्रित करण्यात आले होते. श्री. संजय लेले यांनी स्वतः सूर्यनमस्कार घालून कार्यक्रमात उत्स्फुर्त सहभाग नोंदविला. याच कार्यक्रमाचे औचित्य साधून कार्यक्रमाच्या ठिकाणी बँकेचा स्टॉल उभारला होता. यामध्ये उपस्थितांना बँकेचे Jet Pay Application वापरण्यासाठी मार्गदर्शन करण्यात आले. यासाठी Play Store वरून Application Download करणेची माहिती देण्यात आली. श्री. संजय लेले यांनी मनोगत व्यक्त केले.

Application ची माहिती देण्यासाठी शाखेतील सात सेवक व डाटा सेंटर मधील १ सेवक उपस्थित राहिले होते. टी.व्ही. मालिका अभिनेते श्री. सुनिल गोडबोले यांनीदेखील आपल्या स्टॉलला भेट देऊन ॲप्लिकेशनबाबत माहिती घेतली. त्यामुळे आपल्या स्टॉलला मिळणारा प्रतिसाद अधिक वाढला. या कार्यक्रमास चिंचवड स्टेशन शाखेतील सेवकांव्यतिरिक्त लातूर शाखेचे शाखा व्यवस्थापक श्री. राजेंद्र वर्तक, मुख्य कचेरीतील वरिष्ठ अधिकारी श्री. संजय गायकवाड व DR Site येथील अधिकारी श्री विजय रजपूत, निवृत्त ए.सी.पी. श्री. प्रदीप अष्टपुत्रे, क्रीडा भारतीचे श्री. सुभाष कुलकर्णी व कोथरुड भागाचे संघसंचालक श्री. हिरामण जगताप आणि सकाळ पेपरचे संचालक श्री. भाऊसाहेब पाटील हेदेखील उपस्थित होते.

## नऱ्हे-आंबेगाव शाखेतर्फे औद्योगिक व्यावसायिकांकरिता मेळाव्याचे आयोजन

बँकेची ७०वी शाखा दत्तनगर, नऱ्हे-आंबेगाव खातेदारांचे सेवेत दिनांक १४ ऑगस्ट २०१७ पासून रुजू झालेली असून शाखेतर्फे परिसरातील औद्योगिक व्यावसायिकांकरिता भव्य मेळाव्याचे आयोजन मंगळवार दि. ६ फेब्रुवारी २०१८ रोजी शाखेमध्ये केले होते. नऱ्हे, जांभूळवाडी, दत्तनगर, आंबेगाव व धायरी या भागातील प्रगतशील व्यावसायिक व नव्याने व्यवसायात पदार्पण करू इच्छिणाऱ्या व्यावसायिकांना बँक देत असलेल्या विविध टेक्नोबेस सेवा, ठेवी व कर्ज यांबाबत सविस्तर माहिती उपलब्ध व्हावी व जुन्या-नव्या व्यावसायिकांचा एकमेकांशी परिचय व्हावा व त्याद्वारे व्यवसाय वृद्धिंगत व्हावा, नोकरी न करता व्यवसाय करून रोजगाराची निर्मिती व्हावी, या हेतूने सदर मेळाव्याचे आयोजन केले होते.

या मेळाव्यास परिसरातील छोटेमोठे ७८ उद्योजक तसेच श्री. देविदास जाधव, श्री. सप्तश्री, श्री. अतिवाडकर, श्री. नितीन जांभळे, सौ. शुभांगी बेलदरे, बँकेच्या संचालिका सौ. मधुरा कसबेकर, नगरसेवक श्री. शंकरराव बेलदरे त्याचप्रमाणे दे आसरा फौंडेशनचे श्री. पोतदार, मुख्य कचेरीतील वरिष्ठ अधिकारी श्री. मंदार देशपांडे उपस्थित होते. शाखा व्यवस्थापक श्री. सुनील सा. धुमाळ यांनी बँकेचा परिचय करून देवून कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन केले.

गतिमान, परिपूर्ण व अत्यंत सुरक्षित तंत्रज्ञानावर आधारित बँकेच्या N.E.F.T./R.T.G.S., Mobile Banking, IMPS Banking, Internet Banking, E-Commerce, Any Branch Banking, ATM cum Rupay Debit Card, JetPay [UPI App], SMS Alert, Statement by email or Fax इत्यादी सेवा सुविधांचा वापर बँकेचे १२ लाखांपेक्षा जास्त ग्राहक करतात असे श्री. धुमाळ यांनी सांगितले. कार्यक्रमाचा समारोप कु. मधुरा केळकर यांनी केला.

## गोरेगाव शाखेमध्ये 'कचरा व्यवस्थापन' कार्यशाळेचे आयोजन

रविवार दि. १७/१२/२०१७ रोजी गोरेगाव शाखेमध्ये मुंबई महानगरपालिका (P. South) व My Green Society (NGO) यांच्या सहकार्याने कचरा व्यवस्थापन (वेस्ट मॅनेजमेंटद्ध) या विषयावर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाला बँकेचे मुंबईस्थित संचालक मा. श्री. प्रभाकर परांजपे व सीपीसी मुंबईचे प्रमुख व सहा. महाव्यवस्थापक श्री. चंद्रशेखर प्रभुणे उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात शाखा व्यवस्थापक श्री. अंकुश बेटकर यांच्या प्रास्ताविकाने झाली. त्यानंतर श्री. निलय चौबळ, CEO My Green Society (NGO) यांचे पीपीटी प्रेझेंटेशन त्यानंतर श्री. मकवाना, बीएमसी अधिकारी यांनी उपस्थितांना विषयाचे महत्त्व सांगून त्यांचे शंकासमाधान केले.

## सेवक अनिरुद्ध पळशीकर यांच्या व्याख्यानमाला आयोजनाचा अनोखा उपक्रम

भुसावळ मित्र मंडळ, पुणे ही संस्था पुणे येथे कार्यरत असून संस्थेतर्फे विविध उपक्रमांतर्गत समाज प्रबोधनाचे कार्य चालते त्याचाच एक भाग म्हणून दि. २७ व २८ जानेवारी २०१८ रोजी एका व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये स्वातंत्र्यवीर सावरकर जीवन अभ्यासक डॉ. सौ. शुभा साठे यांचे 'माझी जन्मठेप' या विषयावर, तर ब्रिगेडियर श्री. हेमंत महाजन यांचे 'सागरी सुरक्षा एक आव्हान' या विषयावर मार्गदर्शनपर व्याख्यान संपन्न झाले. या व्याख्यानमालेला श्रोत्यांनी प्रचंड प्रतिसाद दिला. व्याख्यानमालेचे अध्यक्षपद माजी खासदार मा. श्री. प्रदीप रावत यांनी भूषवले. व्याख्यानमालेचे आयोजन आपल्या बँकेचे सेवक श्री. अनिरुद्ध पळशीकर यांनी केले होते. श्री. पळशीकर भुसावळ मित्र मंडळ, पुणेचे संस्थापक-अध्यक्ष आहेत. संस्थेच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा!

**वाचकांना नम्र आवाहन :** शाखा, कर्मचारी, ग्राहक, बँक, बँकिंग इ. विषयी असणारी उपयुक्त बातमी, विशेष उपलब्धी, माहिती, गौरव, पुरस्कार किंवा लेख संबंधित छायाचित्रांसह जरूर पाठवावेत. यासाठीचा मजकूर A4 साईजच्या पांढऱ्या कागदावर सुवाच्च अक्षरात लिहून बंद पाकिटातून पुढील पत्त्यावर पाठवावा. यामधील वेचक वेधक मजकूर गरुड झेप मध्ये प्रकाशित केला जाईल. **पत्ता : श्री. राजन कोळपकर, मनुष्यबळ विकास विभाग, मुख्य कार्यालय, पुणे. मो. क्र. : ९९६०१२३३३१**
**गरुड झेपसाठीची माहिती, लेख, फोटो इ. ईमेलद्वाराही पाठविता येईल. ✲ ईमेल आयडी : hrd@janatabankpune.com**

गरुड झेप

गरुड झेप ही गृहपत्रिका केवळ खासगी वितरणासाठी प्रकाशित केली आहे. यातील मते व्यक्तिगत असून बँक त्याचेशी सहमत असेलच असे नाही. गृहपत्रिकेसाठी लिखाण, सूचना इ. साठी मनुष्यबळ विकास विभाग, मुख्य कचेरी येथे संपर्क साधावा.
**दूरध्वनी : ०२०-२४४५०५४०, मो. नं. ९९७०८००३४८. संपादकीय समन्वय : श्री. भालचंद्र कुलकर्णी, जनसंपर्क अधिकारी (मो. : ९८२२८८२५०९)**

११/०४/२०१८